“भटक्या जमाती - क मधील धनगर समाजासाठी आवश्यक असलेल्या परंतु अर्थसंकल्पीत निधी उपलब्ध नसलेल्या योजना/ कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट)”

महाराष्ट्र शासन
इमाव,सावशैमाप्र,विजाभज आणि विमाप्र कल्याण विभाग
शासन निर्णय क्र. न्यूबयो-२०१९/प्र.क्र.२४ /अर्थसं,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- १९ सप्टेंबर, २०१९

संदर्भ :- आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.न्युबयो-२०११/प्र.क्र.८७/का.७, दिनांक २१.०६.२०१३

प्रस्तावना :-

माहे जून २०१९ च्या अर्थसंकल्पीय भााषणामध्ये मा.वित्त मंत्री यांनी “धनगर समाज बांधवांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम याअंतर्गत, आदिवासी समाजाच्या उन्नतीकरिता ज्या योजना राबविल्या जातात, त्याच धर्तीवर धनगर समाजाच्या विकासासाठी विविध २२ योजना राबविण्याचा शासनाचा मानस असून, त्यासाठी रु.१०००.०० कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, अशी घोषणा केली आहे. त्या अनुषंगाने दिनांक ३० जुलै, २०१९ रोजी संपन्न झालेल्या मंत्रीमडळाच्या बैठकीत आदिवासीच्या धर्तीवर १३ योजना लागू करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. सदरहू १३ योजनांपैकी, “भटक्या जमाती - क या प्रवर्गातील धनगर समाजासाठी आवश्यक असलेल्या परंतु अर्थसंकल्पीत निधी उपलब्ध नसलेल्या योजना / कार्यक्रम राबविण्यासाठी **केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट)**” या योजनेस मान्यता मिळाली आहे.

आदिवासी विकास विभागामार्फत “न्युक्लिअस बजेट” ही योजना सन १९८१-८२ पासून राबविण्यात येत असून, त्या अनुषंगाने आदिवासी विकास विभागाने वेळोवेळी मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. आदिवासी विकास विभागाकडून संदर्भाधीन शासन निर्णयान्वये केंद्रवर्ती अर्थसंकल्प अंतर्गत प्रकल्प अधिकारी यांचेमार्फत राबवावयाच्या कर्जविरहीत योजना व त्यासाठी वापरावयाचा निधी यासंबंधी मार्गदर्शक सूचना व आर्थिक मर्यादेत वाढ याबाबत सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. प्रस्तुत योजना प्रामुख्याने आदिवासी व्यक्ती व कुटूंब केंद्रबिंदू मानून त्यांचे जीवनमान उंचाविण्याच्या दृष्टीने निर्माण करण्यात आलेली आहे. आदिवासी विकास विभागाच्या धर्तीवर सदरहू योजना “भटक्या जमाती - क मधील धनगर” या प्रवर्गातील समाजासाठी राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातीसाठी सुरु असलेल्या योजनांच्या धर्तीवर धनगर समाज बांधवांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम राबविण्याच्या अनुषंगाने, महाराष्ट्र राज्यात निरनिराळ्या क्षेत्रात राहणाऱ्या “भटक्या जमाती - क मधील धनगर समाजासाठी आवश्यक असलेल्या

परंतु अर्थसंकल्पीत निधी उपलब्ध नसलेल्या योजना / कार्यक्रम राबविण्यासाठी **केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट)**” ही योजना राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. ज्या योजना “भटक्या जमाती - क मधील धनगर " या प्रवर्गाचा विकास किंवा कल्याणाच्या दृष्टीने स्थलकालानुरुप आवश्यक आहेत आणि त्या योजनांचा समावेश अर्थसंकल्पात नाही अशा अभिनव स्वरुपाच्या स्थानिक महत्वाच्या योजना, तांत्रिक औपचारिकतेमुळे दीर्घ कालावधीकरिता अडकून न पडता स्थानिक पातळीवर तातडीने आणि प्रभावीपणे कार्यान्वित करुन त्यांचा लाभ गरजू धनगर समजाला प्रत्यक्ष मिळवून देणे ही योजनेची संकल्पना आहे. ज्यावेळी लोकप्रतिनिधींकडून अशा स्वरुपाची एखादी योजना राबविण्यासंदर्भात निवेदन प्राप्त होईल, त्यावेळी नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेनंतर सदरहू योजना राबविण्यात येईल. **<u>तथापि, या योजनेमध्ये लाभार्थीना कर्ज देणे अपेक्षित नाही.</u>** या योजनेकरिता ठोक स्वरुपात रु.५०.०० कोटी इतकी तरतूद राखून ठेवण्यात येईल.

२.(अ) सदर योजना राबविण्याबाबतची मार्गदर्शक त्तत्वे आदिवासी विकास विभागाच्या दि.२१ जून २०१३ च्या शासन निर्णयानुसार वेगळ्याने निर्गमित करण्यात येतील.

३. **लेखाशीर्ष**

सद्य:स्थितीत “भटक्या जमाती - क मधील धनगर समजासाठी आवश्यक असलेल्या परंतु अर्थसंकल्पीत निधी उपलब्ध नसलेल्या योजना / कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट)” या योजनेसाठी नवीन लेखाशीर्ष घेण्यात येईल.

४. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या मान्यतेने तसेच, वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.५३६/२०१९/व्यय-१४, दि.१९.०९.२०१९ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०९१९१८२९०१४२२२ असा आहे . हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=VJNT OBCS SBC Welfare Dept., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2019.09.19 18:35:08 +05'30'

(भा. र. गावित)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. मा. मंत्री, इमाव,सावशैमाप्र,विजाभज आणि विमाप्र कल्याण विभाग, यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई
४. मा. राज्यमंत्री, इमाव,सावशैमाप्र,विजाभज आणि विमाप्र कल्याण विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मुख्य सचिव, यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा. विरोधी पक्ष (विधान परिषद), विधानभवन, मुंबई.
८. मा. विरोधी पक्ष (विधान सभा), विधानभवन, मुंबई.
९. सर्व मा. विधान सभा सदस्य / विधानपरिषद सदस्य, विधानभवन, मुंबई.
१०. महालेखापाल, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
११. सर्व अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव, मंत्रालयीन विभाग,
१२. प्रधान सचिव, इमाव,सावशैमाप्र,विजाभज आणि विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. जिल्हाधिकारी (सर्व)
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व), जिल्हा परिषद.
१५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
१६. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र क. संचालनालय, पुणे
१७. उप सचिव / अवर सचिव / कार्यासन अधिकारी, इमाव,सावशैमाप्र,विजाभज आणि विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण.
१९. सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण
२०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२१. निवड नस्ती (का-अर्थसंकल्प), इमाव,सावशैमाप्र,विजाभज आणि विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.